सन २०१७-१८ मध्ये जिल्हा कृषि महोत्सव योजना राबविण्यास प्रशासकीय (वित्तीय मान्यतेसह) मान्यता व मंजूर निधी वितरणास मान्यता देण्याबाबत..........

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र.कृविका- २०१७/प्र.क्र.११४ /३ अे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७

वाचा: १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज-२०१५/प्र.क्र.३५०/३४, दि.१९.१०.२०१५
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.४१/३अे, दि.५.१.२०१७
३) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. पुरक -२०१७/प्र.क्र.१२९/अर्थ-३ दि. १८.८.२०१७

प्रस्तावना -.

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषि योजना/उपक्रमांची माहिती, संशोधित कृषि तंत्रज्ञान, नाविन्यपुर्ण प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव, बाजारपेठ व्यवस्थापन, कृषि पुरक व्यवसाय इत्यादीबाबतचे मार्गदर्शन उपलब्ध व्हावे. कृषि प्रदर्शन, कृषि विषयक परिसंवाद आणि अनुभवी शेतकरी/उद्योजकांची व्याख्याने, यशस्वी शेतकरी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व विचारवंत यांची थेट भेट घडावी व सामान्य शेतकऱ्यांना शंका निरसन करून घेता यावे. उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेवर आधारीत धान्य व खादय महोत्सव तसेच फळे, फुले व भाजीपाला महोत्सव इत्यादीचे आयोजन करण्यासाठी मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित ३४ जिल्हयांमध्ये दरवर्षी ५ दिवसांचा जिल्हा कृषि महोत्सव साजरा करण्याच्या राज्य योजनेस शासन निर्णय दि.५.१.२०१७ अन्वये शासन मान्यता देण्यात आली आहे.

सन २०१७-१८ मध्ये जिल्हा कृषि महोत्सव या योजनेकरीता या विभागाने रु. ६८०.०० लक्ष इतका निधी राखुन ठेवला होता . तथापि लेखाशिर्षाअभावि हा निधी मार्च २०१७ च्या अधिवेशनामध्ये अर्थसंकल्पित करण्यात आला नव्हता . तथापि तदनंतर या विभागाने जिल्हा कृषि महोत्सव योजनेकरिता नवीन लेखाशिर्ष प्राप्त करुन घेतला असल्याने सदरहू योजना राबविण्यासाठी रु. ६८०.०० लक्ष एवढा विनाअर्थसंकल्पित असलेला निधी अर्थसंकल्पित करुन घेण्यासाठी सन २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या मान्यतेसाठी पूरक मागणी सादर करण्यात आली होती . सदर पूरक मागणीअन्वये रु.६८०.०० लक्ष एवढया निधीस विधीमंडळाने मान्यता दिली आहे .तदनुसार सदर निधीस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब व वित्त विभागाच्या दि. ३० जुन २०१७ च्या परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या आधिकारानुसार मंजुर तरतुदीच्या ७०% म्हणजेच रु. ४७६.०० लक्ष एवढा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासनाने पुढील निर्णय घेतला आहे .

शासन निर्णय -

सन २०१७-१८ मध्ये मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित ३४ जिल्हयांमध्ये कृषि महोत्सव योजना राबविण्यासाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रु.६८०.०० लक्ष (अक्षरी रुपये सहा कोटी ऐंशी लक्ष फक्त) एवढया निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थसंकल्प-३, दि.३०.६.२०१७ नुसार सदर योजनेसाठी पुरवणी मागणी द्वारे मंजुर झालेल्या रु.६८०.०० लक्ष एवढया तरतुदीपैकी ७०% निधी रु.४७६.०० लक्ष (अक्षरी रुपये चार कोटी श्याहत्तर लक्ष फक्त) एवढा निधी आयुक्त (कृषि) यांना वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात देत आहे.

३. या प्रित्यर्थ होणारा खर्च सन २०१७-१८ मध्ये मंजुर झालेल्या अनुदानातून खालील लेखाशिर्षाखाली करण्यात यावा .

मागणी क्र.डी-०३,
२४०१ पीक संवर्धन,
१०९, विस्तार व शेतकरी प्रशिक्षण
(०१) माहिती व प्रचार,
(०१) (५४) जिल्हा कृषि महोत्सव योजना ,
(२४०१ अे६९१) ३३ अर्थसहाय्य

४. शासन निर्णय दि.५.१.२०१७ मधील स्थायी सूचनानुसार जिल्हा कृषि महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यासाठी जिल्हयातील शासन यंत्रणा पुरेशी व सक्षम आहे किंवा कसे याची सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा नियामक मंडळ (आत्मा) (मुंबई व मुंबई उपनगर वगळून) यांनी खातरजमा करावी अन्यथा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज-२०१५/प्र.क्र.३५०/३४, दि.१९.१०.२०१५ अनुसार शासनाच्या विविध विभागांच्या योजनांसाठी प्रसिध्दी तसेच जाहीरात विषयक कामे पार पाडण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने ई-निविदा मागवून मान्यता दिलेल्या व्यावसायिक अर्हताप्राप्त १० संस्था (Empaneled Agencies) मधून सुयोग्य इव्हेंट कंपन्यांची जिल्हा कृषि महोत्सव आयोजनासाठी निवड करावी. योजनेचा उद्येश, स्वरुप, घटक तसेच प्रस्तुत महोत्सव आयोजनाबाबतच्या अन्य सर्व सूचना विचारात घेवुन त्यांच्या जिल्हयात मार्च, २०१८ अखेरपर्यंत सर्व कार्यक्रमांनी परिपूर्ण अशा जिल्हा कृषि महोत्सव आयोजन करावे.

५. या आदेशाअन्वये जिल्हा कृषि महोत्सव कार्यक्रम आयोजनासाठी वितरित करण्यात आलेला निधीसंदर्भात आयुक्त (कृषि) यांना नियंत्रण अधिकारी तसेच सहायक संचालक, लेखा-१, कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. आहरण व संवितरण अधिकारी यांनी या योजनेअंतर्गत प्राप्त होणारा मंजुर निधी आहरित करून सर्व प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या खात्यात तात्काळ जमा करावा.

७. प्रकल्प संचालक, आत्मा यांनी सदर योजनेअंतर्गत कार्यक्रम आयोजनावरील खर्चाच्या/ मानधनाच्या रकमा सर्व संबंधितांना DBT (Direct Benefit Transfer) व्दारे संबंधितांना कार्यक्रम आयोजनानंतर १ आठवडयात प्रदान कराव्यात.

८. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आत्मा नियामक मंडळ यांनी जिल्हा कृषि महोत्सव आयोजनाबाबतचा अहवाल आयुक्त (कृषि) यांना कार्यक्रम आयोजनानंतर १ महिन्यात सादर करावा.

९. आयुक्त (कृषि) यांनी शासन परिपत्रक वित्त विभाग दि., दि.१८.४.२०१७ , दि.३०.६.२०१५ , दि.८.८.२०१७ व दि. १८.८.२०१७ मधील अटींचे अनुपालन करावे. तदनुसार वित्त विभागाच्या सदरहू परिपत्रकातील अटींच्या पूर्ततेच्या अधीन विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१०. आयुक्त (कृषि) यांनी वितरित निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र पुढील निधी वितरीत करण्यापूर्वी शासनास सादर करावे.

११. आयुक्त (कृषि) यांनी जिल्हा कृषि महोत्सव योजनेचा आढावा घेऊन सदर योजनेचा वार्षिक अहवाल शासनास सादर करावा . सदर योजना मुल्यमापणासाठीचे निकष आयुक्त (कृषि) यांनी त्यांच्या स्तरावर निश्चित करावेत . तसेच आयुक्त (कृषि) यांनी या योजनेअंतर्गत शिल्लक निधीबाबतचा तपशील शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१५१७१४१०४५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2017.09.15 17:04:16 +05'30'

(च.वि.घायतडक)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा नियामक मंडळ (आत्मा)
(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

३) सर्व जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा तथा सदस्य सचिव जिल्हा कृषि महोत्सव संयोजन समिती

४) सर्व सदस्य, जिल्हा कृषि महोत्सव संयोजन समिती

प्रत –

१) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२) मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
३) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्य सचिव
५) सर्व अपर मुख्य सचिव / सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालय.
६) सर्व विभागीय आयुक्त.
७) आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई, महाराष्ट्र २ नागपूर
९) महालेखापाल, (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई, महाराष्ट्र २ नागपूर
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क अधिकारी, मुंबई.
११) आयुक्त, पशुसंवर्धन, औंध, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) आयुक्त, दुग्धव्यवसाय विभाग,आरे कॉलनी, गोरेगाव, मुंबई
१५) आयुक्त, मत्स्य व्यवसाय विकास, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन ड्राईव्ह, मुंबई
१६) साखर आयुक्त, पुणे,
१७) सहकार आयुक्त, पुणे
१८) कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
१९) कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
२०) कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर,
२१) कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी,
२२) महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भोसले नगर, भांभुर्डा, पुणे -७
२३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व) मुंबई-९३
२४) संचालक रेशीम उद्योग संचालनालय, प्रशासकीय इमारत इमारत क्र.२, ६ वा माळा, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, सीव्हील लाइन्स, नागपूर
२५) संचालक,सी.आय.सी.आर, नागपूर,
२६) संचालक, संत्रा संशोधन केंद्र, नागपूर (सी.आय.सी.सी.)
२७) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, प्लॉट नं.आर-७, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७
२८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाउुस, प्रभादेवी, सेच्युरी बाजार जवळ, मुंबई-२५
२९) व्यवस्थापकीय संचालक, महाबीज, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्या., महाबीज भवन, कृषि नगर, अकोला- ४४४ १०४
३०) व्यवस्थापकीय संचालक, राज्य मार्केटींग फेडरेशन, मुंबई ,
३१) व्यवस्थापकीय संचालक, खादी ग्रामोद्योग
३२) व्यवस्थापकीय संचालक, नॅशनल हॉर्टीकल्चर मिशन, पुणे,

३३) व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थीक विकास महामंडळ,
३४) व्यवस्थापकीय संचालक, महाग्रेप्स, ई-५, निसर्ग, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे- ३७
३५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या., कृषि उद्योग भवन, दिनकरराव देसाई मार्ग, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व) मुंबई-६५
३६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, ५३९/बी, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७
३७) प्रकल्प संचालक, MACP, महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्प, Plot No.F/E/७८, पहिला मजला, LDB, Trg. centre बिल्डिंग, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे- ३७
३८) कार्यकारी अधिकारी, एम.आय.डी.सी .लिमिटेड, मुंबई.
३९) संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, धरमपेठ, नागपूर
४०) सर्व संचालक, महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
४१) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
४२) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
४३) सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद.
४४) सर्व मंत्रालयीन विभाग
४५) नियोजन विभाग, कार्यासन १४३१, मंत्रालय, मुंबई
४६) वित्त विभाग, कार्यासन व्यय-१, मंत्रालय, मुंबई
४७) कृषि व पदुम विभाग/ कार्या.२ अे, मंत्रालय, मुंबई
४८) निवड नस्ती /कार्या.३ अे कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

* * *